जा. क्र. 6543/2017

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०

15 DEC 2017

**परिपत्रक क्र.** ५२८ **दिनांक** १५/१२/२०१७

धर्मादाय रुग्णालयात मा.उच्च न्यायालयाच्या योजनेनुसार उपचार करताना उपचारासाठी पात्र असणाऱ्या गरीब, निर्धन व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णाकडे तहसीलदारांचा उत्पन्नाचा दाखला/रेशन कार्ड/दारिद्र्य रेषेखालील पत्रिका असणे आवश्यक आहे. परंतु असे निदर्शनास आले आहे की, अनेक गरीब रुग्ण हे अनाथ, बेघर अथवा भटके असल्यामुळे त्यांच्याकडे मा.उच्च न्यायालयाच्या योजनेप्रमाणे आवश्यक असलेली कागदपत्रे आढळून येत नाहीत. त्यामुळे अशा रुग्णांना उपचाराबाबत अडचणी निर्माण होत आहेत व अशा रुग्णांच्या उपचाराबाबत काय करावे असा प्रश्न निर्माण होतो.

धर्मादाय संघटनेतील अधिकाऱ्यांना असे निर्देशित करण्यात येते की, आपले अखत्यारीतील धर्मादाय रुग्णालयांना असे कळविण्यात यावे की जर एखादा गरीब रुग्ण अनाथ, बेघर अथवा भटका असेल व तो मा.उच्च न्यायालयाच्या योजनेप्रमाणे उपचार करण्यास पात्र असेल तर अशा रुग्णांवर त्वरीत मोफत अथवा सवलतीच्या दराने उपचार केले जावेत. त्यांच्याकडे कागदपत्र नाहीत म्हणून त्यांना उपचारापासून वंचित ठेवू नये. सदरील धर्मादाय रुग्णालयांच्या सोशल वर्कर्सनी त्या गरीब रुग्णांच्या आर्थिक परिस्थितीबाबत खात्री करावी व त्यांना काही अडचण असेल तर त्या जिल्ह्याच्या धर्मादाय कार्यालयाशी संपर्क साधून योग्य ते मार्गदर्शन घ्यावे. अशा रुग्णांबाबत तात्काळ धर्मादाय कार्यालयास कळविण्यात यावे. परंतु कुठल्याही परिस्थितीत पात्र गरीब रुग्णांना उपचारापासून वंचित ठेवले जाणार नाही अथवा उपचार नाकारले जाणार नाहीत याची काळजी घ्यावी.

याबाबत काही प्रश्न निर्माण झाल्यास संबंधित जिल्ह्यातील देखरेख समिती यावर निर्णय घेईल.

(शि.ग.डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त तथा अध्यक्ष, देखरेख समिती
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)